नि. फौ. ख. क्र.३१७/२०१४
शासन–वि– डॉ. गिरीश
निशाणी क्र. ७१ वर पुढे सुरु

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. घुगे यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

हे म्हणणे खरे आहे की, आरोपीविरुध्द पुर्वी दाखल झालेला नियमित फौजदारी खटला क्रमांक ३७१/२०१२ हा समुचीत अधिकारी यांनी खटला दाखल केला नाही या कारणावरुन मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये खारीज झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतची फिर्याद जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दाखल केलेली आहे. सरतपासात नमुद व्यक्तिव्यतिरीक्त इतर कोणीही टीममध्ये हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८.०६.२०११ पुर्वी आरोपीचे सोनोग्राफी सेंटर बंद झाले होते.

दि.१८.०६.२०११ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक श्री.जाधव होते. ते प्रशिक्षणाला गेल्यामुळे त्या दिवशी त्यांचा कार्यभार माझ्याकडे लेखी आदेशाने होता. आता मला नि.क्र.७२ वरील लेखी आदेश दाखविण्यात आला. त्यामध्ये जावक क्रमांक दि.१९.०६.२०११ रोजीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०६.२०११ रोजी माझ्याकडे जिल्हा शल्य चिकित्सक या पदाचा कार्यभार नव्हता व त्यामुळे कार्यवाही करण्याचा अधिकार नव्हता. टीम मधील सर्व सदस्य हे जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या तोंडी आदेशान्वये आले होते. आमच्या टीमने आरोपीच्या सोनोग्राफी सेंटरला जाऊन कार्यवाही करावी असे आम्हाला लेखी आदेश नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८.०६.२०११ रोजी टीम मधील इतर सदस्यांना मी वरिष्ठ होतो व ते माझ्या म्हणण्याप्रमाणे कार्य करत होते.

हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०० वरील इनसपेक्शन अहवाल हा आरोपीच्या सोनोग्राफी सेंटरवर करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०० प्रमाणे नोंदणीचे प्रमाणपत्र प्रतिक्षाकक्ष व सोनोग्राफी कक्ष येथे लावलेले आहे असा उल्लेख आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०० प्रमाणे मराठी व इंग्रजी भाषेत बोर्ड प्रतिक्षाकक्ष व सोनोग्राफी कक्ष येथे लावलेले आहे असा उल्लेख आहे. हे

S
19.11.26

नि. फौ. ख. क्र.३१७/२०१४
शासन–वि– डॉ. गिरीश
निशाणी क्र. ७१ वर पुढे सुरु

म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०० मध्ये सोनोग्राफी करणारे डॉ. विजयकुमार आनंदराव इंगे यांचे नाव नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी सोनोग्राफी करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सोनोग्राफी करणाऱ्या डॉक्टरांना एफ फॉर्म भरणे गरजेचे असते. एफ फॉर्म भरले अथवा नाही याबाबत डॉ. इंगे यांच्याकडे विचारपुस केली नाही किंवा त्यांना कोणतीही नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ज्या गोष्टी होत्या त्याची नोंद नि.क्र.१०० वरील अहवालात घेतली आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.१८.०६.२०११ पुर्वी सोनोग्राफी सेंटर बंद झाल्याने त्या दिवशी सदर ठिकाणी सोनोग्राफी चाचणी होत नव्हती.

आरोपीच्या सोनाग्राफी सेंटरविषयी कोणतीही तक्रार प्राप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्या कालावधीत काही घटना घडल्यामुळे सर्व सोनोग्राफी सेंटरवर भेट देऊन पडताळणी करण्याचे आदेश होते. जप्ती पंचनामा नि.क्र.९२ आता मला दाखविला असता तो पंचनामा जाग्यावर केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा पंचनामा मशीन सिल करण्यापुरता आहे. सदर पंचनाम्यावरील पंचांना पंच म्हणुन हजर राहण्यासाठी नोटीस दिली नव्हती. सदर पंचांचे जबाब घेतले नाहीत. टीम मधील इतर सदस्यांचे जबाब घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरील पहिल्या पानावर कोणाच्याही सहया नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, डॉ. इंगे यांना सदर प्रकरणात आरोपी केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सर्व कागदपत्रे व आवश्यक रेकॉर्ड अस्तीत्वात असल्याने डॉ. इंगे यांच्याविरुध्द पुरावा मिळुन आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, एफ फॉर्म भरण्याची जबाबदारी आरोपीची नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, पीसीपीएनडीटी कायद्याअंतर्गत कार्यवाही करण्यासाठी आमच्यावर दबाव होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर दिवशी इनसपेक्शन करण्याचा अधिकारी मला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही त्रुटी आढळुन आली नसल्याने आरोपीला कारणे दाखवा नोटीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोणतीही कागदपत्रे

8
19.1.26

नि. फौ. ख. क्र.३१७/२०१४
शासन–वि– डॉ. गिरीश
निशाणी क्र. ७१ वर पुढे सुरु

दि.१८.०६.२०११ रोजी जप्त करण्यात आले नाहीत. आरोपीला कार्यवाही बाबतची नोटीस दिली होती. सदर नोटीस दाखल केलेली नाही. इनसपेक्शनचा अहवाल जिल्हा नियोजन समितीला सादर केला नव्हता. आता मला दि.११.०४.२०११ रोजीचे आरोपीने पाठविलेले पत्र दाखविले. सदरचे पत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांना मिळाले असुन त्यावर पत्र मिळाले म्हणुन वैद्यकीय अधिकारी श्री. शर्मा यांची सही आहे. ती मी ओळखतो. सदरचे पत्र साक्षीदारास उलटतपासात दाखविल्याने त्यास **नि.क्र.१०८** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या सोनोग्राफी सेंटरवर कार्यवाही करण्याचा मला कोणताही अधिकारी नव्हता.

**उर्वरीत उलटतपास दोषारोप निश्चित करेपर्यंत तहकुब करण्यात येतो.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

19.1.26

(सि. म. पाडोळीकर)
मुख्य न्यायदंडाधिकारी,
जालना.

दिनांकः १९.०१.२०२६